6/4/86

महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषदेचे वतीने संगमनेर (जि. अहमदनगर) येथे

# – रोजगार हमी कामगारांची राज्य परिषद –

रविवार दि. ६ एप्रिल १९८६

दुपारी १२ ते ५ पर्यन्त

स्थळ– अनंत फंदी खुले नाटयगृह,
( कॉ. डी. एस. कुलकर्णी नगर )
एस. टी. स्टँड व मामलेदार कचेरी
मागे, संगमनेर, जि. अहमदनगर

---

★ अध्यक्ष– **कॉ. संतराम पाटील** ★ उद्‌घाटक– **कॉ. दत्ता देशमुख**

★ प्रमुख पाहुणे– **डॉ. वि. म. दांडेकर, कॉ. यशवंत चव्हाण**

---

स्वागताध्यक्ष– **कॉ. गुलाब देशमुख**

रोजगार हमी कामगार, शेतमजूर बंधू भगिनींनो,

१९७२–७३–७४ च्या महादुष्काळाचे काळात प्रत्येक गरजूस नियमीत काम, उत्पादक कामे काढण्यासंबंधी आग्रह, स्त्री-पुरुषांना समान व योग्य वेतन, योग्य मापे व वेळेवर पगार आणि कामावर सोईसुविधा यासाठी लक्षावधी दुष्काळग्रस्त शेतमजूर, गरीब मध्यम शेतकरी यांनी महाराष्ट्रात प्रचंड आंदोलन छेडले. १६ मे १९७३ रोजी महाराष्ट्रातील १५ लाख दुष्काळी कामगारांनी एक दिवसांचा लाक्षणिक संप केला.

परिणामी उत्पादक कामे काढण्याचे धोरण सरकारला घ्यावे लागले. महाराष्ट्रात प्रत्येक गरजूस रोजगारांची हमी देणारा कायदा त्यानंतर करावा लागला. या कायद्यात हंगामाचे काळात शेतीला मजूर उपलब्ध व्हावेत म्हणून शक्यतो कामे काढू नयेत, गावाजवळ पंचायत समिती हद्दीत कामे नसल्यास जिल्हयांत कोठेही कामे द्यावीत अशा त्रुटी असल्या; तरी रोजगाराची कायदेशीर हमी व बेकामभत्याचा अधिकार या मुख्य बाबी आहेत. महाराष्ट्रातील कामगार–कष्टकऱ्यांच्या चळवळीची परंपरा व जनतेच्या लोकशाही मताचे उत्थापन यामुळे देशात फक्त महाराष्ट्रातच हा कायदा झाला आहे.

★ दुष्काळाचे निर्मुलन व महाराष्ट्राचा विकास –

महाराष्ट्रातील ग्रामीण श्रमिकांच्या या महान उत्थापनामुळेच १९४८ साली झालेल्या किमान वेतन कायद्यानुसार शेतमजूरांसाठी किमान वेतन दर राज्यकर्त्यांना निश्चित करावे लागले. त्याची दोनदा फेररचना झाली. परंतु राष्ट्रीय धोरणाप्रमाणे व इतर धंदयात गृहीत धरतात त्याप्रमाणे किमान वेतन ठरवितांना कुटुंबात एक मिळवता आहे असे गृहित धरण्याऐवजी शेतमजूरांसाठी किमान वेतन निश्चित करतांना नवरा बायको दोघे मिळवते आहेत असे गृहित धरण्यांत आले. शेतमजूरांचे श्रम मध्यम कष्टाचे आहेत असे गृहित धरण्यांत आले. कि. वे. दर खालच्या पातळीवर रहावेत यासाठी हे कारस्थान करण्यात आले. इतर धंदयांप्रमाणे महागाईची भरपाई करणारा खास भत्ता ठरविण्यांत आला नाही. तसेच शेती व्यवसायाचे यांत्रिकीकरण, विजेची वाढती उपलब्धता, शेती उत्पादनात सुधारणा व त्यातील विविधता लक्षांत घेऊन अतिकुशल, कुशल, निमकुशल असे वर्गीकरण करण्यास नकार देण्यात आलेला आहे. तिसऱ्या वेतन समितीने वीज, वाफ व तेल यावर चालणाऱ्या यंत्रावर काम करणाऱ्या कामगारांचे व सालगडी, महिनेदाराचे फक्त किमान वेतन निश्चीत केले आहे.

दरम्यानच्या काळात रोजगार हमी कायद्याखाली घ्यावयाच्या उत्पादक व अन्य कामांची व्याप्ती वाढलेली आहे. पाझर तलाव, नालाबंडींग पासून गांवतळी, सामुदायिक विहीरी, भूमिगत बंधारे, कॅनॉल व चाऱ्या ते जमीन सपाटीकरण, पाणलोट क्षेत्राची बांधणी, सामाजिक वनीकरण इथपर्यंत ही व्याप्ती वाढली आहे.

सध्या महाराष्ट्रात तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. कांही भागातील उरल्या सुरल्या रब्बीच्या पिकांची काढणी, मळणी इ. कामे आटोपल्यावर १–२ महिन्यानंतर लाखोंना रोजगाराची गरज भासणार आहे.

दुष्काळाशी मुकाबला करण्यासाठी प्रत्येकाला काम पुरवू व प्रत्येक गांवाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करु अशा घोषणा सरकार करत आहे. पण सरकारच्या घोषणा व प्रत्यक्ष कृति यामध्ये खूपच अंतर आहे असा अनुभव महाराष्ट्रातील जनतेला येत आहे.

पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याची घोषणा माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी १९८४ साली केली होती. १९८५ साली तीच घोषणा त्यांनी केली. त्यांचे नवे (की जुने?) वारसदार मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव निलंगेकरांनी या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी पुन्हा युद्ध पातळीवरील प्रयत्नांच्या घोषणा केल्या. पिण्याच्या पाण्याच्या तात्पुरत्या सोयी करण्यासाठी कोटयावधी रुपये खर्ची पडत आहेत. पण राज्यकर्त्यांनी पावसाचा पडणारा प्रत्येक थेंब अडविणे व मुरविणे या संबंधी धोरण घेऊन ते अंमलात आणल्यामुळे सततच्या दुष्काळी परिस्थितीचे परिणामी भूगर्भातील पाण्याची पातळी सतत खाली जात आहे. ती पातळी वर आणण्यासाठी कायम स्वरुपी व्यवस्थेच्या खास व मोठ्या योजना अंमलात आणणे आवश्यक आहे, अशी सार्वत्रिक मागणी आज होत आहे.

## ★ ग्रामीण विकास व दुष्काळ निर्मुलनाचा एकमेव मार्ग -

त्यासाठी महाराष्ट्रातील चालू असलेल्या सर्व धरण योजना त्वरेने पुऱ्या करणे, संकल्पित योजना कॉ. दत्ता देशमुख, डॉ. दांडेकर व देऊसकर यांनी शिफारस केलेल्या योजनेच्या पायावर सुरु करुन गतीने पुऱ्या करणे, नद्या व नाल्यावर भूमिगत पाझर तलाव बांधणे, डोंगर पायऱ्या पायऱ्याने बांधून काढणे, दुष्काळी टापूतील किमान एका पिकास पाणी मिळेल अशा पायावर आणि क्षेत्रावर नव्हे तर माणसांच्या संख्येवर पाटपाण्याचे रेशनिंग करणे, ऊस, फळबागा व अन्य बारमाही पिके विहीरीवर त्यांची क्षमता पाहून घेणे असे सर्वंकष धोरण अंमलात आणले तर दुष्काळाचे निर्मुलन व पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य नाहीसे होऊ शकते. त्यासाठी बडया सधन बागायतदारांचा व इतर हितसंबंधियांचा विरोध मोडून काढला पाहिजे.

तसेच धरण ग्रस्तांच्या पुनर्वसनाचा कायदा थोपटे समितीच्या पोषक शिफारशीनुसार सुधारुन सर्व धरण-योजनांना लागु करण्यासाठी हितसंबंधियांचा विरोध जर मोडून काढला व धरणग्रस्तांच्या विकसनशील पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रातून ठराविक प्रमाणात जमीन संपादली, तसेच कमांडमधील जमिनीची खाजगी विक्री थांबवून विकणारावर सरकारलाच जमीन विकण्याचे बंधन घातले, तरच जमिनीची गंगाजळी तयार होईल, पुनर्वसनाबरोबरच पुढील योजनांसाठी निधीही उपलब्ध होऊ शकेल व महाराष्ट्राच्या खुंटलेल्या विकासाचा मार्ग मोकळा होईल आणि प्रादेशिक असमतोलाचे प्रश्न सुटतील. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या वाटयाला आलेल्या पाण्याचा मुदतीत वापर करण्याच्या योजना पुऱ्या करता येतील.

पण सधन शेतकऱ्यांच्या वर्गवर्चस्वाखाली असलेले महाराष्ट्र सरकार हे धोरण घेत नाही. वर्गीय हित-संबंधामुळे असे सर्वंकष धोरण घेणे त्याना अशक्य होत आहे. तेव्हा हे धोरण अंमलात आणण्यासाठी महाराष्ट्रा-तील शेतमजुर, गरीब–मध्यम शेतकरी व त्यांचेतील रोजगार हमींवर कामे करणाऱ्या कामगारांनी पुढाकार घेऊन इतर ग्रामिण श्रमिकांशी व्यापक जूट बांधून व संघटना ऊभारुन संघर्ष केला पाहिजे. यातुन महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची, नियमित रोजगाराची, योग्य वेतन वेळेवर मिळण्याची, भ्रष्टाचार निर्मुलनाची, शेतमजूर व रोजगार हमी कायद्यातील तरतुदी अंमलात आणण्याची व त्यात सुधारणा करण्याची शाश्वती निर्माण होणार आहे.

दुष्काळाचे निर्मुलन व पाटपाण्याचे फ़ेरवाटप या प्रश्नांवर कॉ. दत्ता देशमुख, डॉ. वि. म. दांडेकर व श्री. देऊसकर यांनी चालविलेल्या लोकशिक्षणाच्या कार्यक्रमातून उभ्या रहाणाऱ्या लोकशाही मताचा दबाव याकामी उपयुक्त ठरणार आहे. अर्थात हा लढा सोपा नाही. कायद्यात समाविष्ट झालेल्या रोजगाराच्या हमीची अंमलबजावणी करुन घेण्याबाबत सातत्यपूर्ण चळवळ चालू असलेल्या अहमदनगर जिल्हयातील अनुभवावरुन हे स्पष्ट होत आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील बागायत टापूत जमिनीचे बड्या शेतकऱ्यांकडील केन्द्रीकरणामुळे तसेच रोजगारासाठी इतर जिल्ह्यांतून येणाऱ्या भूमिहीन, शेतमजूरांच्या वाढत्या संख्येमुळे तसेच शेतीतील यांत्रिकीकरण व आधुनिकीकरण यामुळे रोजगाराच्या मागणीची तीव्रता वाढली. गेली २० वर्ष क्रियाशील असलेल्या अहमदनगर जिल्हा शेतमजूर युनियनच्या संघटनात्मक आधारामुळे श्रीरामपूर, कोपरगांव, राहुरी, नेवासा, संगमनेर आदि टापूमध्ये रोजगार हमी कायद्यातील तरतूदींपैकी गरजूस नियमित रोजगार, योग्य मापे व वेतन, भ्रष्टाचारास प्रतिबंध यासाठी सातत्यपूर्ण चळवळ चालू आहे.

## ★ सधन शेतकरी व सरकारचा विरोध -

रोजगार हमी कायद्याची सक्त अंमलबजावणी करुन घेण्याच्या सातत्यपूर्ण चळवळीचे परिणामी गांवोगावी ाजूर व गरीब शेतकरी स्थिरपणावर संघटीत झाले. त्यांच्या गांवसमित्या संघटीत होऊ लागल्या. नियमितपणे रोजगार मिळणे, योग्य व वेळेवर वेतन, भ्रष्टाचाराचा बंदोबस्त, गांवातील स्वस्त धान्याच्या दुकानात चांगले धान्य, साखर व इतर वस्तु उपलब्ध करणे, धनदांडग्यांच्या दादागिरीला व दडपशाहीला विरोध अशा उपक्रमात या गांव–समित्यांनी पुढाकार घेऊन जनतेच्या हालचाली सुरु केल्या.

त्यामुळे अधिकारी व गांवोगावांतील प्रतिष्ठित सधन शेतकरी व त्यांचे प्रभावाखाली असलेले विविध राजकीय पक्ष यांना गांवोगांवी वर्ग पायावर संघटीत होऊ लागलेल्या गांव समित्यांची चळवळ काट्यासारखी सलू लागली. दुष्काळाचे पार्श्वभूमिवर मध्यम शेतकरी थरांतही कामाची गरज वाढत आहे. ते सुद्धा या चळवळीत भागीदारी करु लागले. यामुळे अधिकारी आणि सधन शेतकरी थरातले नेतृत्व यांचा विरोध वाढू लागला.

अहमदनगर जिल्हा शेतमजूर युनिनयने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन क्रमांक ४५५४/८३ मध्ये मा. न्यायालयाने रोह कायद्याखाली दुष्काळी टापूतील शेतमजूरांसाठी ठरविलेल्या ४ थ्या परिमंडळ (झोन) साठी ठरविलेले किमान वेतन दर देण्याची तरतुद रद्दबातल ठरविली व त्या त्या परिमंडळातील किमान वेतन दर द्यावेत असा निर्णय दिला. त्यामुळे बारमाही बागायती टापूत १० रुपये, हंगामी बागायती टापूत ८ रुपये व दुष्काळी भाग वगळता बाकी जिरायत क्षेत्रात ७ रु. याप्रमाणे वेतनवाढ देण्यासाठी शासनाला रोह कामाचे दरात वाढ क ची लागली. तसेच रोह कायद्याखालील १ रुपया ऐवजी ताबडतोबीने २ रु. बेरोजगार भत्ता देण्याचा व नंतर त्यात वाढ करण्याची शिफारस करणारा निर्णय उच्च न्यायालयाने दिला. कायदा झाल्यापासून राज्यात शासनाला प्रथमच श्रीरामपूर तालुक्यातील मालुंजे येथील रोह कामगारांना बेकाम भत्याची थकबाकी द्यावी लागली. यामुळे सरकारचा मस्तक शूळ उठला.

## ★ रोह कायद्यातील तरतुदींच्या पायमल्लीचे सरकारी धोरण –

रोह कायद्यातील व नियमातील तरतुदीनुसार रोजगाराची गरज असणाऱ्याने नमुना क्रमांक ४ मध्ये अर्ज केल्यानंतर त्यांची पोच देऊन १५ दिवसात तहसीलदाराने गावाजवळ काम उपलब्ध करुन दिले पाहिजे. तसे काम नसल्यास पंचायत समिती हद्दीत काम द्यावे व तसेही काम नसल्यास जिल्ह्यांत इतरत्र काम उपलब्ध करुन द्यावे, अशी तरतुद केलेली आहे. तसेच वाहन व्यवस्था अगर सर्व सोईनी उपयुक्त कॅम्प्स काढण्याची व्यवस्था मान्य करण्यांत आलेली आहे.

मात्र रोजगार मागणी करणारे नमुना ४ मधील अर्जाचे नमुने शासनाने उपलब्ध केले नाहीत. अहमद–नगरच्या युनियनने दाखल केलेल्या याचिकेच्या निर्णयात मा. उच्च न्यायालयाला तसा आदेश द्यावा लागला. तेव्हा युनियनने हजारो फॉर्म्स छापून घेऊन हे काम चालविले होते. पण सध्या तलाठी ते अर्ज स्विकारुन पोच देत नाहीत. तहसिलदाराकडे गांव समित्या अथवा युनियनच्या वतीने सादर केलेले अर्ज स्विकारले जात नाहीत. नगरच्या कलेक्टर यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले तर त्यांनी ते परत पाठविले. पान क्र. ५ वरील २, ३, ४ व ५ हे परिच्छेद वाचावेत

एवढेच नव्हे तर समन्वय समितीच्या निर्णयाप्रमाणे ३१ ऑक्टो. १९८५ रोजी महाराष्ट्र भर प्रचंड निदर्शने झाली. त्यावेळी राज्यभर सादर केलेल्या निवेदनांतील मागण्यांबाबत अ. जि. शेतमजूर युनियनला मंत्रालयातून मजूर खात्याचे क्र. संकीर्ण १०८६/२३१३/कामगार–७ दि. २ जानेवारी १९८६ रोजीचे पत्र आले आहे. त्यात शेतमजूर किमान वेतन दराची फेररचना करण्यासाठी अनौपचारीक कि. वे. समिती नेमण्याचा विचार चालला असल्याचे नमूद केले आहे. म्हणजे कुटुंबातील व्यक्तींची व मिळवित्यांची संख्या, किमान गरजा भागविण्यासंबंधीचे निकष, निर्देशांकाशी कि. वे. दर जोडणे असें "उपचार" या समितीवर बंधनकारक राहाणार नाहीत.

या पत्रात असेही म्हटले आहे की, "शेती उद्योग हा कारखानदारीसारखा उद्योग नाही. बहुसंख्य असंघटीत कामगार आहेत. शेती व्यवसायाचे स्वरुप, शेती मालक व मजूर यांचे संबंध वगैरे बाबी लक्षात घेता शेतमजूरांसाठी सर्वंकष कायदा करणे सध्या तरी अशक्य आहे. तसेच निवृत्ती वेतन योजना लागू करणे सध्या व्यवहार्य नाहं याशिवाय रोजगार हमी कामाबाबतच्या मागण्यांचा संबंध नियोजन विभागाशी व इतर मागण्यांचा संबंध समाज–कल्याण, कृषि व सहकार इत्यादी खात्यांशी असल्याचे पत्रात नमूद केलेले आहे.

या पत्राचा अर्थ असा आहे की महाराष्ट्रातील रोह कामगार व शेतमजूरांच्या चळवळीने उपस्थित केलेल्या सर्वच मागण्या महाराष्ट्र सरकार विचारातदेखील घ्यावयास तयार नाही. तेंव्हा मागण्या हशील करण्यासाठी अधिक शक्ती सामर्थ्य उभे करण्याच्या प्रयत्नानाच जोर लावला पाहिजे.

## केंद्र सरकारचे जनता विरोधी धोरण –

केन्द्र सरकारचा राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व दारिद्रय रेषेच्या खालच्यांना त्या रेषेंच्यावर आणण्या-संबंधीचा कार्यक्रम यांच्या अम्मलबजावणीबाबतही वेगळा अनुभव नाही. दारिद्रय रेषेच्यावर अशी कुटुंबे आणण्यासाठी दुभती जनावरे व अन्य साधने मिळविण्यासाठी गावातील शेकडो गरीब अर्ज करतात. त्यापैकी २–३ जणांना अशी मदत मिळते. त्यात मोठा भ्रष्टाचार होतो आणि ती जनावरे सांभाळण्यामध्ये जीव जेरीला येतो.

स्वावलंबी बनविण्याच्या आमिषाने ग्रामिण गरीबामध्ये लाचारी आणि वरिष्ठ वर्ग व सरकारवर. अवलंबित्वाची भावना वाढविणे, यापेक्षा वेगळी निष्पत्ती या कार्यक्रमांतून होत नाही. दारिद्रयरेषेच्या व्याख्येत बदल करुन दारिद्रय कमी दाखवले जात आहे. हे तर भंपकपणाचे व फसवणूक करणारे आहे.

पंतप्रधान राजीव गांधी यांनी अधिकारावर आल्यानंतर सादर केलेल्या पहिल्या अंदाजपत्रकात बडे भांडवल-दार व इतर मालमत्ताधारी वर्गाला मोठ्या प्रमाणावर सवलती दिल्या. देशातील प्रतिगाम्यांचे अर्थ शास्त्रज्ञ व वित्त–शास्त्रातील एक अर्ध्वर्यू नानी पालखीवाला यांनी या अंदाजपत्रकाचे " स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वोत्कृष्ट, युगप्रवर्तक अंदाजपत्रक " अशी स्तुती केली. त्या नंतरच्या काळात देशी बडे भांडवलदार, व्यापारी, बडे बागायतदार आणि बहूराष्ट्रीय कंपन्या यांना अनेक तऱ्हेच्या सवलती देण्यात आल्या आहेत. बडे भांडवलदार व अधिकारी यांच्यावर पडणाऱ्या धाडी मुख्य धोरण दिशा बदलाच्या दर्शक नाहीत.

सामाजिक सेवांवरील खर्चात कपात करण्यांत येत आहे. तर सामान्य जनतेस स्वस्त धान्य दुकानातून मिळ–णाऱ्या साखर, गहु, तांदूळ, ज्वारी यांच्या किंमती वाढविल्या आहेत. कोळसा, रॉकेल व पेट्रोलजन्य वस्तुच्या किंमती वाढ-विण्याने सार्वत्रिक भाव वाढ झाली आहे. केंद्र व राज्य सरकारांच्या संकल्पित अंदाजपत्रकात नेहमीप्रमाणे सामान्य जनतेवर अधिक बोजे टाकण्यांत येणार आहेतच. विकास प्रयत्नातून गबर झालेल्या शहरी व ग्रामीण धनिकांवर जादा करवाढ व त्यांच्या खिशाला कात्री लावून साधनसामुग्री उभी करण्याचा प्रयत्न करण्याचे कटाक्षाने टाळले जात आहे.

काम नसल्याने श्रमशक्ती पडून रहात असलेल्या भारतासारख्या मागास देशात श्रमघन उद्योग काढणे, रोजगार वाढवून क्रयशक्ती वाढविणे व त्यातुन विकास योजनाना चालना देणे या धोरणाऐवजी एक प्रगत राष्ट्र म्हणून भारताने २१ व्या शतकात प्रवेश करण्याच्या नावाखाली गणकयंत्राचा, इलेक्ट्रॉनिक तंत्राचा वाढता वापर, यंत्र-तंत्राच्या आयातीच्या मार्गाने आधुनिकीकरणाची गती वाढविण्याचे धोरण जोरदारपणे मांडण्याची व अंमलात आणण्याची मोहीम पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरु आहे. या परिणामी देशात बेकारी वाढत आहे व वाढणार आहे. पान नं. ८ वरील १,२,३ हे परिच्छेद वाचावेत

अहमदनगर जिल्ह्याप्रमाणे नाशिक, जळगांव, औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर इत्यादी जिल्ह्यांतून सुद्धा नमुना ४ मधील अर्ज स्विकारले जात नाहीत असा अनुभव येत आहे. अर्ज स्विकारुन पोच दिली की १५ दिवसात काम काढणे व न काढल्यास बेकाम भत्ता देणे अशी कायदेशीर जबाबदारी टाळण्यासाठी हे राज्यव्यापी धोरण सरकारने स्विकारलेले दिसते.

कोपरगाव तालुक्यातील रोह कामगारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे नगरला मोर्चा नेला. तेंव्हा दोन दिवसात काम देण्याचे आश्वासन दिले. परंतु दोन दिवसांनी १५० कि. मि. अंतरावरील कुकडी डाव्या कालव्यावरील कामावर जावे असा लेखी आदेश दिला. श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभानच्या कामगारांनाही असेच लेखी उत्तर मिळाले. कार्यकर्त्यांनी कुकडी डाव्या कालव्यावरील कामास व अधिकाऱ्यांना भेटी दिल्या, तेंव्हा तेथे किरकोळ स्वरुपाची कामे चालू होती व तीही निविदा काढून कंत्राटदारांना दिलेली होती असे दिसले. जिल्हाधिकाऱ्यांना हें कळविले. परंतु अद्याप दुसरे काम किंवा बेकाम भत्ता देण्यांत आलेला नाही.

रोह कायद्यात नमूद झालेल्या हक्कांची अम्मलबजावणी करण्यासाठी चाललेल्या प्रयत्नांची अशी वासलात लावली जात आहे. १९७२–७३ च्या दुष्काळानंतरचा हंगाम चांगला असला तरी किमान १५ लाख मजूरांना नियमीत कामाची गरज आहे हे स्पष्ट झाले. सध्या दुष्काळी परिस्थिती असूनही फक्त ६ ते ७ लाखांना अधून मधून कामे दिली जातात. कामे काढण्याची टाळाटाळ, काम काढले तरी वेतन अनेक आठवडे थकविणे, कुपनावर धान्य न मिळणे अशी छळवणूक चालू आहे.

एव्हढेच नव्हे, तर महाराष्ट्रातील सर्व मोठ्या व मध्यम प्रकल्पांची कामे बंद करुन खात्यातील नोकरांची कपात चालविली आहे. अलिकडे महाराष्ट्र सरकारने दिनांक २० जानेवारी १९८६ आदेश क्र. महाराष्ट्र इजीएस / १८८५, २८०/ एमपी – ४८० या आदेशाद्वारे "रोजगार हमी योजनेखाली चालू असलेली कालवे व चाऱ्यांची सर्व कामे बंद करा" अशा सक्त सूचना दिल्या आहेत. रोह कायद्यातील तरतुदी धाब्यावर बसवून रोजगार मर्यादित केला जात आहे सातव्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण रोजगार वाढीची घोषणा केलेली असली तरी प्रत्यक्षात रोजगार घटविला जात आहे, हे स्पष्ट आहे.

## ★ कि. वे. दरांची पुनर्रचना व इतर मागण्यांची वासलात !

सध्याचे शेतमजूर किमान वेतन दर १/२/१९८३ पासून अंमलात आहेत तेंव्हापासून महागाई निर्देशांकात झालेली वाढ लक्षांत घेऊन या दरात व रोह कामाच्या दरात वाढ करण्याच्या मागणीवर मजूरमंत्री तिडके यांचेशी शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समितीच्या शिष्टमंडळाच्या अनेकदा चर्चा झाल्या. परंतु महागाईतील वाढीचे वास्तव लक्षात घेऊन तात्पुरती वाढ देण्याच्या प्रयत्नांत मुख्यमंत्री व सरकार नाहीत असे निष्पन्न झाले. आणि रोह कायद्यातील तरतुदीनुसार शेतमजूर व रोह कामगारांशी व दलीत चळवळीशी संबंधीत प्रतिनिधी राज्य सल्लागार समितीवर घेण्याची अनेक वर्षे अंमलात असलेली प्रथा गुंडाळून कॉ. दत्ता देशमुख, साथी बा. न. राजहंस, कॉ. सुदाम देशमुख, भाई एन. डी. पाटील, रा. सु. गवई यांना सल्लागार समितीतून वगळण्यात आले आहे. पान नं. ८ वरील १,२,३ हे परिच्छेद वाचावेत –

अशा तऱ्हेने देशातील दारिद्रय, महागाई, बेकारी वेगाने वाढत आहे. भ्रष्टाचाराने जीवनाची सर्व अंगे नासविली आहेत. यामधून देशातील फुटीरतावादी शक्तीत साम्राज्यवादयांच्या हस्तकांना व बहुराष्ट्रीय मक्तेदारी कंपन्यांना रान मोकळे सापडते. या प्रतिगामी शक्तींचा बंदोबस्त वर्गजागृत कामगार व ग्रामीण श्रमिक या शक्तीच संघटीतपणे करु शकतात. पण कष्टकरी समुहांच्या वर्ग जागृतीच्या संघटीत प्रयत्नांना प्रतिरोध व प्रतिबंध करणे आणि कृतिशील होणाऱ्यांवर दडपशाही करणे अशा सरकारी व भांडवलदार वर्गाच्या आणि त्यांच्या पक्षांच्या धोरणाचा अनुभव शहरी आणि ग्रामिण भागात येतो.

या पार्श्वभूमीवर राज्यातील रोजगार हमी कामगारांची व शेतमजूरांची ही परिषद भरत आहे. यंदाच्या तीव्र दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर यापुढे परिस्थिती अधिक तीव्र, स्फोटक बनणार आहे. तेंव्हा खालील मागण्या हस्तगत करण्यासाठी, महाराष्ट्राच्या प्रत्येक खेडयात रोह कायद्यातील रोजगार हमी व अन्य हक्कांची अम्मलबजावणी, शेतमजुर किमान वेतनाची अम्मलबजावणी, त्यात दुपटीने वाढ, निवृत्तीवेतन व परिस्थितीत सुधारणा करुन घेण्यासाठी गाववार संघटीत झालें पाहिजे, आपल्या श्रमिकांच्या स्वतंत्र गांव कमिटया संघटीत केल्या पाहिजेत.

या क्रमांत तयार होणाऱ्या शक्ती सामर्थ्यातून दुष्काळाचे निर्मूलन, पाटपाण्याचे फेरवाटप, खाजगी शेतीवरील शेतमजूरांना संघटीत होण्यास कि. वे. ची अम्मलबजावणी करुन घेण्यास चालना, आदिवासी व दलितांच्या बडयांनी लुबाडलेल्या हस्तांतरीत जमिनी परत मिळणे, वहितीखाली आणलेल्या सरकारी जमिनी कायम हक्काने मिळणें, धरण व प्रकल्पग्रस्तांचे विकसनशील पुर्नवसन करुन घेणे, दलित – आदिवासी व स्त्रियांवरील अन्याय अत्याचाराचा बंदोबस्त या आपल्या वर्ग प्रश्नांची सोडवणूक होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## – मागण्या –

१) **सध्या अस्तित्वात असलेले शेतमजूर किमान वेतन दर ठरल्यापासून महागाईत दुप्पट वाढ झालेली असल्याने सरकारने आदेश काढून शेतमजूर कि. वे. दर व रोह कामांचे दर दुप्पट करावेत. शेतमजूर कि. वे. त अतिकुशल, कुशल, निमकुशल कामाचे दर ठरवून किमान वेतन निर्देशांकाशी जोडून खास भत्ता लागू करावा.**

२) **प्रत्येक गरजूस गांवापासून ५ कि. मि. च्या आत काम मिळाले पाहिजे. काम न दिल्यास महागाई भत्त्यासह होणाऱ्या वेतनाच्या ५० टक्के दराने बेकाम भत्ता द्या.**

३) **१५ वर्षावरील युवक–युवतीना रोह काम मिळालेच पाहिजे.**

४) **रोह कामातून निर्माण होणारी संपत्ती व जिंदगी यामध्ये रोह कामगारांना वाटा मिळाला पाहिजे.**

५) **पिण्याचे पाणी, लहान मुलांसाठी कामाचे ठिकाणी व गांवोगावी पाळणा घरे, वेळेत पगार, दररोज मापे घेऊन चिठ्ठया देणे, भ्रष्टाचाराचा मजूर समित्यांमार्फत बंदोबस्त व लांबचे कामावर वाहन वा कॅम्पची व्यवस्था केली पाहिजे.**

६) **कामाचे ठिकाणी दर मजूरांस रोज एक किलो स्वच्छ व सकस धान्य पगाराचे वेळेस देण्याची व धान्य मिळेपर्यंत कुपन चालु राहण्याची व्यवस्था झाली पाहिजे. शेतमजूर व रो. ह. कामगारांना सरकारमान्य दुकानांमधून जीवनावश्यक सर्व वस्तू कमी दरात द्या.**

७) गांव, तालुका व जिल्हा पातळीवर म. रा. शेतमजूर परिषदेच्या संलग्न युनियनचे व मजूरांचे लढाऊ प्रतिनिधी सल्लागार समित्यांवर घ्यावेत. राज्य सल्लागार समितीवर रोह कायद्यातील तरतुदीनुसार परिषद व इतर राज्यव्यापी शेतमजूर व रोह कामगार संघटनांचे प्रतिनिधी घ्यावेत.

८) मुंबई उच्च न्यायालयाचे निवाड्याची राज्यभर अम्मलबजावणी करुन न्यायालयाचा निर्णय ते दरवाढीचे सरकारी परिपत्रक निघुन त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंतच्या मधल्या काळासाठी वाढीव दराने रोह कामगारांना थकबाकी देण्यात यावी.

९) कामासाठी आवश्यक हत्यारे रोह कामगारांच्या कमिट्यांकडे देण्यात यावीत. हत्यारांचे भाडे व शेवटणीच्या खर्चात वाढ करुन तो वेतनाबरोवर देण्यांत यावा.
रोह कामावरील भ्रष्टाचाराचा बंदोबस्त करण्यासाठी कामगारांच्या गांव समित्यांना मापे, वेतनपत्रके, हजेरी पत्रके तपासण्यासाठी मिळाली पाहिजेत.

१०) शेतमजूरांसाठी कामगारांना लागू असलेल्या सर्व सेवाशर्तींची तरतुद करणारा स्वतंत्र कायदा केला पाहिजे.

११) शेतमजूर व रोह कामगारांना पेन्शन व विमा योजना लागू करावी.

१२) रोह कायद्याखाली 'ब' वर्ग नगरपालिकेच्या कक्षेतील गरजूंना कामे पुरविण्यात यावीत.

वरील मागण्या हस्तगत करण्याची व गांववार संघटीत होण्याची ग्वाही राज्यभर फिरविण्यासाठी व भावी आंदोलनाच्या आखणीचा विचार करण्यासाठी ही परिषद होत आहे. गांवोगांव ज्यांची संख्या मोठी आहे व ती वाढत आहे, अशा शेतमजूरांना संघटीत करण्याचे व त्यांचे प्रतिनिधीसुद्धा मोठ्या संख्येने हजर ठेवण्याचे प्रयत्न रो. ह. कामगार, कोतवाल, मैल कामगार, वीज व पाटबंधारे कामगार यांनी करावा व परिषद यशस्वी करावी, असे आवाहन आम्ही करतो.

तेंव्हा कामा कामावर व गांवागावातून वर्गण्या जमा करुन परिषदेस प्रतिनिधी पाठवावेत अशी विनंती आहे. घटीत औद्योगिक व ग्रामीण कामगार वर्गाचे भातृप्रतिनिधी परिषदेस पाठविण्याची आम्ही विनंती करतो.

आपले विश्वासू,

| | | |
|---|---|---|
| **जीवनराव सावंत** | **भास्कर जाधव** | **भि. र. बावके, श्रीरामपूर** |
| कार्याध्यक्ष | सरचिटणीस | सहचिटणीस |
| **गणपत लोके, सटाणा** | **रुख्मीनीबाई माने, बारामती** | **भाऊ खमाट, औरंगाबाद** |
| उपाध्यक्ष | उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| **मारुती कांबळे** | **सौ पुष्पलता आराळकर, कोपरगांव** | **पिराजी राजापूरकर नांदेड** |
| खजिनदार | सहचिटणीस | सहचिटणीस |

**महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद**

---

टीप- १) संगमनेरसाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, लातुर, नाशिक, अहमदनगर, इ. ठिकाणाहून बसगाड्या आहेत.

२) कांबच्या प्रतिनिधींसाठी ५ व ६ ता. च्या रात्रीची मुक्कामाची सोय केलेली आहे. नगरजिल्ह्याबाहेरील प्रतिनिधींसाठी दि. ६ रोजी दुपारच्या जेवणाची सोय केलेली आहे. ३) एक रुपया देऊन प्रत्येक प्रतिनिधींने बिल्ला घ्यावा.

४) परिषदेच्या तयारीसंबंधात तसेच येणाऱ्याप्रतिनिधींच्या संभाव्य संख्येबाबत दिनांक ३ एप्रिल १९८६ पूर्वी कोल्हापूर, अहमदनगर व संगमनेर येथील कार्यालयांकडे न चुकता रिपोर्ट पाठवावेत. संपर्कासाठी संगमनेरचा पत्ता- कॉ. विश्वनाथ वाकचौरे ट्रेड युनियन सेंटर, तहसील कचेरीजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

* रो. ह. कायदा व त्यातील रोजगाराचा हक्क मोडीत काढण्याचा सरकारचा डाव उधळुन लावण्यासाठी ——————

* शेतमजूर व रो. ह. मजूर वेतन दुप्पट करुन घेण्यासाठी———

* दुष्काळ निर्मूलनासाठी बुलंद आवाज उठविण्यासाठी—

* शेतमजुर व रो. ह. मजुरांच्या गावपातळीवर स्वावलंबी संघटना उभारण्यासाठी————————

————एक व्हा ! जूट करा !! संघटीत व्हा !!!

————६ एप्रील, चलो संगमनेर !!!

(कामगार सहकारी मुद्रणालय मर्या. संगमनेर)